# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.५/२०२६** **दिनांक ०७/०७/२०२६**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०७.०७.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/१२९८/२०२६ दि.०४.०७.२०२६ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०७.०७.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्री. शिवाजी कचरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री. शिवाजी कचरे,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.०२.०६.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२४३ दि.०२.०६.२०२६ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. (कार्यवाही-सभा कामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. श्रींचे दर्शनाकरीता येणारे साईभक्तांचे सोयीसाठी सन-२०२६ मधील पावसाळयाचे कालावधीतील तसेच श्री गुरूपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी उत्सव, श्री साईसच्चरीत पारायण, श्री दत्त जयंती उत्सव, नाताळ व नविन वर्ष-२०२७ चे स्वागताकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी निम्नतम निविदाधारक साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर, ता.श्रीरामपूर यांनी चर्चा-वाटाघाटीअंती देऊ केलेली रू.४७,५०,०००/- मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारून त्यांना कार्यादेश देणेसाठी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र. २४४/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**२. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन-२०२७ चे अनुषंगाने संस्थानचे स.नं.४ मधील साईउद्यान इमारतीचे पश्चिम बाजुकडील कंपाऊंड भिंत व इमारतीच्या सर्व्हिस लाईन्स चेंबर्स जे मंजूर विकास योजनेच्या रस्त्याने बाधित होत आहे त्या काढून सदरहू क्षेत्र शिर्डी नगरपरिषद, शिर्डी यांना रस्त्याचे कामाकरीता खुले करुन देणे व तदनंतर सदर क्षेत्र खुले सोडून संस्थान हद्दीत आतील बाजूस नव्याने कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे व इतर सर्व्हिसेसची कामे पुर्ण करणेसाठी येणा-या रु.१८,१३,०००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. २४४/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**३. संस्थान व रुग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा,कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र. २४४/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

४. सन २०२६-२७ करीता संस्थान व रूग्णालये विभागाकडील मालमत्ता विमा, कामगार कायदा १९२३ अन्वये कर्मचारी विमा व श्री साईभक्तांचा अपघाती विमा इ. पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत तसेच खाजगी विमा कंपन्याकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र. २४४/४** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला. (कार्यवाही-लेखाशाखा)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३** संस्थानचे भांडार विभागासाठी कार्यालयीन स्टेशनरी साहित्य खरेदीकामी फेर ई-निविदेतील प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.२४५** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-खरेदी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.४** कॅन्टीन विभागासाठी माहे जुन-२०२६ ते मार्च-२०२७ या कालावधीसाठी पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर १ लिटर वॉटर बॉटल खरेदी कामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.२४६** प्रस्ताव खालील बाबींची पूर्तता करून पुन: सादर करण्यात यावा :

पुरवठादाराने सादर केलेल्या प्रत्येक तक्रार/हरकतीचा मुद्देनिहाय विचार करून त्यावरील कारणयुक्त निर्णय. विद्यमान दर हा बाजारभावाच्या तुलनेत वाजवी व संस्थेच्या हिताचा असल्याबाबत तुलनात्मक विश्लेषण. मागील खरेदी दराच्या तुलनेत वाढ झाल्याची कारणमीमांसा व त्याबाबत खरेदी समितीचे स्पष्ट अभिप्राय. न्यूनतम निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटींचे इतिवृत्त व अधिक दरकपात शक्य नसल्याबाबतचा लेखी तपशील.

वरील सर्व बाबींचा विचार करून सदर प्रस्ताव संस्थेच्या आर्थिक हिताचा व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य असल्याबाबत खरेदी विभागाचा कारणयुक्त अभिप्राय. (कार्यवाही- खरेदी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५** संस्थानचे आरोग्य विभागासाठी वार्षिक स्वच्छता साहित्य खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.२४७** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६** **सन २०२६-२७ या कालावधीसाठी पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर ०१ लिटर पुरवठा बंद केलेबाबत.**

**निर्णय क्र.२४८** **सदर विषयातील नोंद, त्यासोबत जोडलेले कागदपत्रे तसेच पुरवठादार मे. बाईकाजी अक्वाशुअर सोल्युशन प्रा. लि., लातूर यांनी दि. 23.04.2026 रोजी ई-मेलद्वारे मांडलेल्या निवेदनाचे अवलोकन करण्यात आले.**

**सदर ई-मेलमध्ये पुरवठादाराने पुरवठा करार बंद करण्याची विनंती करण्याबरोबरच संस्थेच्या कार्यपद्धतीबाबत विविध तक्रारी व आक्षेप उपस्थित केले आहेत. विशेषतः माल उतरविण्यास होणारा विलंब, निश्चित संपर्क अधिकारी (Point of Contact) उपलब्ध नसणे, विविध अधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या सूचना दिल्या जाणे, उत्पादनाच्या Manufacturing Date व Batch Number बाबत वारंवार करण्यात येणाऱ्या मागण्या तसेच त्यामुळे व्यवसायिक व आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप करण्यात आलेला आहे.**

**सादर करण्यात आलेल्या टिपणामध्ये मात्र पुरवठादाराने उपस्थित केलेल्या वरील तक्रारींबाबत खरेदी विभागाने कोणतेही स्पष्टीकरण अथवा वस्तुनिष्ठ अभिप्राय नोंदविलेला दिसून येत नाही. तसेच संबंधित आरोपांची पडताळणी करून त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास वस्तुस्थिती निदर्शनास आणून देण्यात आलेली नाही.**
**वरील मुद्दांचे संदर्भाने पडताळणी करुन खुलाशासह फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.७** **संस्थानचे लाडू निर्मिती, मंदिर व प्रसादालय विभागांसाठी गाईचे शुध्द तूप खरेदी कामी सन २०२६-२७ चे ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारक यांचे प्लॅन्टचे व्हेंडर ऑडिटसाठी संस्थानची टिम निश्चित होणेस व पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२४९** **न्यूनतम दराच्या निविदाधारकास पुरवठा आदेश देण्यापूर्वी संबंधित उत्पादकाच्या उत्पादन प्रकल्पाची (Vendor Audit) प्रत्यक्ष पाहणी करून निविदेतील अटी व शर्ती, FSSAI चे निकष, स्वच्छता, गुणवत्ता नियंत्रण व्यवस्था, उत्पादन क्षमता, साठवणूक व्यवस्था, गुणवत्ता परीक्षणाची सुविधा तसेच वेळेत पुरवठा करण्याची क्षमता याबाबत वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक आहे.त्यामुळे न्यूनतम दराच्या निविदाधारकाच्या उत्पादन प्रकल्पाची Vendor Audit करण्यास मान्यता देण्यात येते.**
**Vendor Audit करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :**
**मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी – अध्यक्ष.**

**अन्न सुरक्षा अधिकारी (Food Safety Officer), अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन – तांत्रिक सदस्य.**

**आरोग्य विभागाचे प्रतिनिधी – सदस्य.**
**प्रशासकीय अधिकारी (खरेदी विभाग) – सदस्य.**
**प्रसादालय विभागाचे प्रतिनिधी .**
**गुणवत्ता नियंत्रण/प्रयोगशाळा विभागाचे प्रतिनिधी – सदस्य.**
**विषय तज्ञ- सदस्य.**
**खरेदी विभागातील संबंधित अधिकारी – सदस्य सचिव.**

**सदर समितीने पूर्वनिश्चित तपासणी निकषांनुसार (Checklist) Vendor Audit करून त्याचा कारणयुक्त व स्वाक्षरीयुक्त अहवाल संस्थेस सादर करावा. सदर अहवालात उत्पादकाची गुणवत्ता, उत्पादन क्षमता, निविदेतील अटींचे पालन, FSSAI मानकांचे अनुपालन व पुरवठा करण्याची क्षमता याबाबत स्पष्ट निष्कर्ष नोंदविण्यात यावा.**

**Vendor Audit अहवाल समाधानकारक असल्यासच न्यूनतम दराच्या निविदाधारकास पुरवठा आदेश देण्याबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात यावा. (कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.८ श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता,पेस्ट कंन्ट्रोल कामे करणे व वाढपी, हाऊसकिपींग कामाकरीता आऊटसोर्स पध्दतीने कामगार पुरविणेकामी देण्यात आलेल्या कार्यादेशास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५० प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.९ सन २०२६-२७ करीता अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नवीन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागविणेस व येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५१ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**
**(कार्यवाही-कामगार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.१० संरक्षण विभागाकडील सेवानिवृत्त सशस्त्र (बंदुकधारी) माजी सैनिकांचे रिक्त जागेवर माजी सैनिक इनसोर्स कुशल कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

**निर्णय क्र.२५२ प्रस्ताव मंजूर.**
**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.११** **जनहित याचिका क्र.१५/२०२० मधील होणा-या निर्णयास अधिन राहून सध्याचे सिक्युरीटी कंत्राटदार यांना दि.०१.०७.२०२६ ते दि.३१.१२.२०२६ अखेर मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा समाधी मंदिर सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांना मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन आदेश होईपावेतो दि.०१.०७.२०२६ पासून पुढील कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.१३** **शिर्डी शहराचे उत्तरेकडील नगर-मनमाड महामार्गालगत असलेला नाला क्र.३४ बंदिस्त करुन त्यावर साईभक्तांचे वाहनांकरीता पार्कींग विकसीत करणेचे प्रस्तावास तत्वत: मान्यता देणे तसेच याकामी सल्लागार नियुक्तीसाठी e-RFP प्रस्ताव प्रसिध्द करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५५ पाटबंधारे विभाग/नगर परिषद यांची जागेच्या संदर्भाने प्रथम ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. त्यानंतर फेर प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४** **शिर्डी नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं.१२४ पैकी, १२५ पैकी, १२६ पैकी व सिटी सर्व्हे नं.९४०, ९४१, ९४२ मधील संस्थान मालकीच्या क्षेत्राचे रेखांकन मंजुरीबाबत.**

**निर्णय क्र.२५६ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१५** **श्रींचे लेंडी बागेतील बावडीचे पुर्व बाजुचे जागेत श्री गोपाळकृष्ण मंदिर व श्रीराम मंदिर बांधणेकामी आकिटेक्ट माथुर ॲन्ड कापरे, नवी दिल्ली यांनी दिलेले नकाशे व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५७ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१६** **संस्थानचे साईनाथ मंगल कार्यालय व साईउद्यान लगतचे शिर्डी सर्व्हे नं.४/२ ब २ येथे कै.श्री.केशव कृष्ण प्रधान यांचे स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या केशव मंदिराचे साई सेवा म्हणून नुतनीकरण करणेची संधी मिळणेबाबत श्री साई तपोवन स्पिरिच्युअल ट्रस्ट, सेलम, तामिळनाडू यांनी संस्थानकडे दि.१६.१२.२०२५ रोजी प्राप्त झालेल्या पत्राव्दारे केलेल्या विनंतीबाबत.**

**निर्णय क्र.२५८ तहकुब.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७** **नवीन दर्शनरांग परिसरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) चे वार्षिक ऑपरेटींग व मेंटनन्स (AMC) देणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५९ प्रस्ताव मंजूर. ई-निविदा तीन वर्षाचे कालावधीकरीता मागविण्यात याव्यात. याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **श्री साईबाबा संस्थानचे विज बिलात आर्थिक बचत होऊन भविष्यात हरित ऊर्जा, पर्यावरण, विकासात्मक दृष्टीकोनातून संस्थानचे विविध इमारतीचे टेरेसवर अपारंपारीक उर्जा अंतर्गत १७०० KWp क्षमतेचा ग्रिड कनेक्टेड रुफ टॉप सोलर पी.व्ही. सिस्टीम प्रकल्प BPCL यांचे CSR फंडातून व संस्थानमार्फत उभारणी करणे व त्यासंबंधीत इतर सर्व तदअनुषंगिक कामे करणेकामी निम्नतम दर निविदाधारक मे. किरण सोलर टेक प्रायव्हेट लि., सुरत (Kiran Solar Tech Private Limited., Surat) यांनी चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेले अंतिम दर रक्कम रु.६,३०,००,०००/- (सर्व करांसहित) मात्र इतके दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६० प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-विद्युत विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **संस्थानचे साई धर्मशाळा येथील 380 KLD क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) चे नूतनीकरण करणेसाठी येणारे अंदाजे रु.२४.६० लक्ष मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदरील कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६१ नवीन सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) उभारणीसाठी किती खर्च येऊ शकतो याचे तुलनात्मक माहितीसह फेरप्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२०** **संगणक दुरूस्ती-देखभालीअंतर्गत आवश्यक संगणकीय व अनुषंगीक साहित्य खरेदी करणेसाठी वार्षिक दरकरार निश्चित करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारक निविदाकार यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२६२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालय येथील अद्ययावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२२** **मंदिर व मंदिर परिसरातील जुनी सीसीटीव्ही यंत्रणेचे अद्ययावतीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६४ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल/विधी विभाग)**

---

**विषय नं.२३** **मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कंट्रोल रुम नवीन दर्शन लाईन येथे स्थलांतरीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२४** **निवासस्थाने विभागाकरीता संगणक प्रिंटेड रूम बुकिंग  पावती छपाई करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६६ तहकुब.** **(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.२५** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २२(२) मध्ये सुधारणा होणेबाबत.**

**निर्णय क्र.२६७ प्रस्ताव नामंजूर.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२६ आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर अखर्चित उत्पन्नाचा विनियोग करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६८ प्रलंबीत सिव्हिल ॲप्लीकेशन मध्ये संस्थानची बाजु मांडतांना आपल्या विधिज्ञांनी सदर बाब मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणावी.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२७ माहे एप्रिल-२०२६ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२६९ नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२८ माहे मे -२०२६ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२७० नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२९ दि.०१.०४.२०२६ ते दि.३०.०६.२०२६ या कालावधीत आर्थिक अनुदान मागणी करीता प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२७१ संस्थानचे धोरणाअभावी अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावेत.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.३० श्री गुरूपौर्णिमा उत्सव-२०२६ मधील श्रींच्या पोथी व प्रतिमेच्या मिरवणूकीत वीणा, पोथी, प्रतिमा धरणे तसेच पाद्यपुजा, रूद्राभिषेक इत्यादी कार्यक्रमांसाठी मान्यवरांची नांवे निश्चित होणेबाबत.**

**निर्णय क्र.२७२ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३१ सालाबाद प्रमाणे श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपुर श्री साईबाबा पालखी सोहळयासाठी सहकार्य मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२७३ प्रस्ताव मंजूर. श्री साईबाबांच्या कार्याचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी आणखी काय करता येईल, या संदर्भाने विचार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३२** **अनुकंपा तत्वावर परिविक्षाधीन कालावधीवर तात्पुरत्या नेमणूकीवर असलेल्या अनुकंपा कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३३** **संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतन/मानधनावर ११ महिने कालावधीसाठी अधिकारी/कर्मचारी नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७५ प्रस्ताव मंजूर. सदर पदे कायमस्वरुपी भरण्यासाठी विहीत कार्यपध्दती राबविण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३४** **संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२५-२६ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७६ प्रचलीत पध्दतीने शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस मान्यता देण्यात आली. यासाठी मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३५** **संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी व ठेकेदारामार्फत असलेले कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांचा सन २०२५-२६ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७७ प्रचलीत पध्दतीने शैक्षणिक शुल्क परतावा आदा करणेस मान्यता देण्यात आली. यासाठी मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करुन मान्यता घेण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३६** **श्री.राजाराम भटु सावळे, लिपीक-टंकलेखक, श्री साई प्रसादालय विभाग यांचे विभागीय चौकशी अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२७८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३७** **श्री.सागर बबनराव खामकर,तारतंत्री,पाणी पुरवठा विभाग तथा सरचिटणीस, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी सोशल मिडीयाव्दारे केलेल्या गैरवर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.२७९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३८** **श्री.सोमनाथ देवराम गंगावणे, वर्ग-४ कर्मचारी, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.२८० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३९** **संस्थानचे गट 'ड' संवर्गातील कायम व संस्थान कंत्राटी कर्मचारी तसेच वाहनचालक यांना गणवेश खरेदीकामी शासनचे धोरणानुसार आगाऊ रक्कम अदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४०** **'सेवानिवृत्त' संस्थान कर्मचा-यांना ओळखपत्र देणेबाबत.**

**निर्णय क्र.२८२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४१** **श्री साईबाबा संस्थानचे श्री साई प्रसादालय परिसरात सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी या बँकेचे A.T.M साठी वापरास दिलेल्या बांधीव जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४२ संस्थानचे मंदिर परिसरातील गेट नं.०४ येथील बाहेरील बाजूस असलेली मोकळी जागा पादत्राणेगृहासाठी वापरास परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४३ संस्थानचे मंदिर परिसरातील गेट नं.०४ येथील पुर्वीच्या मोबाईल कॅमेरा क्लोकरूमच्या जागेवरच डिजीटल मोबाईल लॉकर चालविणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८५ प्रस्ताव मंजूर. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जागेचे भाडे निश्चीत करुन त्याप्रमाणे आकारणी करण्यात यावी.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४४ संस्थानचे सुलभ शौचालय इमारतीतील बॅग क्लोकरूमसाठी बांधीव जागा वापरास परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४५ श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थानच्या पार्किंगमध्ये फळे विक्रेत्यांना फळे विक्री करणेकामी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून मिळणेबाबत व करारनामा नोंदवून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४६ संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२५ पै.मध्ये सुरु असलेले श्री साईनाथ माध्यमिक हायस्कुल संस्थानचे स.नं.१०९ मधील जुने कन्या विद्या मंदिर व इंग्लिश मिडीयम स्कुल या जागेत स्थलांतर करणेबाबतच्या निर्णयाबाबत.**

**निर्णय क्र.२८८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४७** **आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांना भगवद्गगीता वितरणासाठी स्टॉल/ गाळयाच्या वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२८९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४८** **महाराष्ट्र राज्य कामगार विमा सेवा सोसायटीचा दवाखाना संस्थान परिसरात सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९०** **तहकुब.** **(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.४९** **मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने बाजू मांडणे करीता संस्थानचे पॅनलवर विनामुल्य सेवा घेणेकामी ॲडव्होकेट नियुक्ती करणेकामी संस्थानचे वेबसाईटवर दिलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जदारांचे मुलाखती घेऊन पात्र ॲडव्होकेट यांची संस्थानचे पॅनलवर नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९१** **अर्जदारांकडून विहीत नमुन्यामध्ये अनुभव माहिती संकलीत केल्यानंतर सदर प्रस्ताव मंजूरीसाठी समितीपुढे ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा मंदिरामध्ये येणा-या भाविकांना प्रसाद म्हणून 'वृक्ष प्रसाद' देणेकामी निंब वृक्षांची रोपे संस्थानचे नर्सरीमध्ये तयार करणेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२** **प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.५१** **श्री साईबाबा महाविद्यालय सहा. प्राध्यापक (Ad-hoc), ग्रंथपाल व शारिरिक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत तसेच नैमत्तिक रजा (Casual Leave) मंजुर करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९३** **प्रस्ताव 'अ' मंजूर. रु.४०,०००/- मासिक मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.**
**प्रस्ताव 'ब' मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.५२ ब्रेक दर्शनपासचे शुल्क वाढविणेबाबत.**

**निर्णय क्र.२९४ प्रति व्यक्ती रक्कम रु.३००/- शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.५३ संस्थानमार्फत विविध राज्यांमध्ये श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार आणि प्रसार करणे तसेच अपप्रचार थांबविणेकामी विविध राज्यांमध्ये किर्तनकार/ प्रवचनकार/ प्रबोधनकार व्यक्तींची मानधन तत्वावर नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९५ प्रस्ताव मंजूर. सविस्तर नियमावली समितीपुढे सादर करावी.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.५४ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.४,५३,९३७/- मात्र अदा करणेस मंजुर मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.५५ दि.०१ एप्रिल २०२५ ते दि.३१ मार्च २०२६ अखेर या कालावधीत वाटप करणेत आलेली अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२९७ नोंद घेतली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.५६** **श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या आर्थिक वर्षात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रू.१३,५४,७३,७७६/- नोंद घेऊन खर्चाच मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९८** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**वरील निर्णय क्र.२४३ ते २९८ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं.५.३० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ. पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(शिवाजी कचरे)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**